पा चे पीक



लेखन: यान एन्ड्रूस्

चित्र: सिबली यंग

मराठी: अश्विनी बर्वे

पा एक शेतकरी आहे. काळ फार कठीण आला आहे, पण यावेळी खूप आशा आहे. बटाट्याची रोपे चांगली वाढत आहेत. जेव्हा पाऊस हवा तेव्हा आला आहे. सूर्यही उष्णता देत आहे. कुटुंब कदाचित प्रथमच भेटवस्तूसहित ख्रिसमस साजरा करू शकेल.


छोटा एफी शेतात पा यांना मदत करतो. आणि पीक प्रत्येक पायरीवर वाढतांना बघतो. पीक एकत्र करण्याची वेळ आली आहे. एफी घोड़ागाड़ीमध्ये बटाटे भरण्यासाठी पा नां मदत करतो. आणि नंतर पा नां आनंदाने ते विकायला जातांना बघतो. पण जेव्हा पा घरी येतात, तेव्हा गाडी रिकामी नाही तर भरलेली असते. सर्व शेतकऱ्यांना बटाट्याचे भरपूर पीक झाले आहे, त्यामुळे आता खरेदीदार कोणी नाही.

बटाटे पुढच्या वसंतापर्यंत तळघरात ठेवले जातात. आणि पा कुटुंबाच्या निर्वाहासाठी जंगलात लाकडे तोडण्यास जातात. वसंतात जेव्हा पा येतात तेव्हा लक्षात येते की बटाटे सडले आहेत.एफी आणि त्याचे वडील आपली आशा निराशेत बदलतांना बघतात.

महामंदीच्या काळातील हा किस्सा एका अशा परिवाराची खरी कहाणी आहे जो पूर्णपणे कंगाल आणि निराश झाला आहे. पुस्तकातील चित्रे त्या काळाला जिवंत करतात ज्यात लोक भयानक त्रासात जगत आहेत. आज एफ्रम आपला अधिकतर काळ विकासशील देशातील विकास परियोजनावर काम करत घालवतात. पण जगातील अनेक लोक आजही अशाच अडचणीचा सामना करतात ज्यात काहीही बदलू शकत नाही.

यान एन्ड्रूस् एक कहाणीकार आहेत. त्यांनी अनेक पुस्तके लिहली आहेत, ज्यात एक लोकप्रिय चित्रकथा *वैरी लास्ट फर्स्ट टाइम* आणि त्यांची कादंबरी कैरी सामील आहे. ते औटोवाच्या जवळ एका तलावाच्या काठी राहतात.

सिबली यंग एक पुरस्कृत युवा चित्रकार आहे, ज्या नेहमी मिनियेचर्स शैलीत काम करतात. हे पहिले पुस्तक आहे ज्यात त्यांनी आपल्या चित्रांनी जिवंत केले आहे. त्या टोरोन्टो मध्ये राहते.



पा नी आपले पीक वसंतात पेरले होते. मी तेव्हा खूप छोटा होतो.पण हे नक्की कळत होतं की बर्फ वितळल्यावर छोटी छोटी तळी तयार होतील. आई नेहमी त्यात न जाण्याची सूचना मला देत असे.

पा ने म्हटले की त्यांना बटाट्याचे पीक घेण्याच्या कामाला सुरुवात केली पाहिजे. त्यांनी मलाही त्यांच्या बरोबर घेतले. माझ्या हातात त्यांनी चाकू दिला. त्यांनी मला काळजी घेण्याचा सल्ला सुद्धा दिला नाही.

मी त्यांच्याजवळ बसलो आणि काम करू लागलो. मी आपले सस्पैन्डर्स (विजार जागेवर राहण्यासाठी बांधलेली नाडी) घातली जे टायरच्या आतल्या ट्यूबने तयार केले होते. मी कधी कधी त्या ओढून पटकन सोडून देत असे, अगदी तसेच जसे पा करत असत.

आम्हांला बटाट्याचा अर्धा आणि त्याचा चवथा भाग कापायचा होता. हे लक्षात ठेवत की प्रत्येक तुकड्यात कमीत कमी एक पांढरा मोड आलेला असला पाहिजे, ज्याला डोळा म्हणतात.

‘‘जर डोळा कापला तर बिचारा खाली जमिनीत काही दिसणार नाही,” पा म्हणाले.

‘‘काय ते खरंच बघू शकतात?” मला जाणून घेण्याची इच्छा होती.



दुसऱ्या दिवशी मला शाळा होती. म्हणून मी पा ना मदत तिथून परत आल्यावर, काही खाल्ल्यावर करू शकत होतो. तेव्हा, जेव्हा मी माझी दुसरी कामे निपटून येई,



लाकडाच्या खोक्यात लाकडे ठेवणे, पाणी आणणे, रात्रीसाठी कंदील तयार करणे, माझी भावंडे हे सगळं करण्यासाठी खूप छोटे होते.

अनेक दिवस गेले. बटाट्याचे तुकडे करण्याचे काम पूर्ण झाले. आता ते पेरण्यासाठी तयार होते. पा मला त्यांच्याबरोबर शेत बघण्यासाठी घेऊन गेले.

"तुला काय वाटते? जमीन नागरण्यासाठी सुकली आहे का?" त्यांनी मला विचारले.

ते तोपर्यंत थांबले जोपर्यंत मी माझी मान हो अशी हलवली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही आमचे घोडे किंग आणि बिलला नांगराला जोडले. त्यांनी शेतात नांगराने रेघा मारल्या. जेवढे होईल तेवढे मी त्यांच्या मागेमागे चाललो. नांगरल्यावर निघणाऱ्या मातीचा गंध खूप चांगला होता. जेव्हा नांगरणे पूर्ण झाले तेव्हा पा नी नांगर घेऊन शेतात जिथे जिथे मोठ मोठे ढेकळे असतील ते मोडले.



‘‘काय वाटते? शेत पेरणीसाठी तयार आहे? त्यांनी विचारले.

मी खाली वाकून नीट मातीकडे बघितले. तेव्हा आपली मान मी परत हो अशी हलवली.



पा नी पेरणी मशीनने शेतात आखलेल्या रेषांवर बटाट्याचे तुकडे पेरायला सुरुवात केली. एक तुकडा मग थोडीशी मोकळी जागा नंतर दुसरा तुकडा.

त्या रात्री माझ्या भावांबरोबर मी स्वयंपाक घराच्या मागे माझ्या अंथरुणावर पडलो होतो. मी पा आईला सांगतांना ऐकले की त्यांनी खत खरेदी केले आहे. ती मोठी कामाची गोष्ट आहे, अर्थात ते खूप महाग आहे.

पा मला म्हणाले की बटाट्याची रोपे कधीही फुटून बाहेर येऊ शकतात. मी धीर धरण्याचा प्रयत्न करतो. पण खरी गोष्ट अशी आहे की पा ना सुद्धा धीर धरवत नाही. रोज सकाळी शाळेत जाण्याच्या आधी ते मला शेतात घेऊन जात. मी खाली वाके आणि माझे डोळे जमीनच्या जवळ घेऊन जाई, जसे त्यांनी सांगितले होते तसे.

“बघ, ते दिसू लागले आहेत!” एक दिवस पा म्हणाले.


मी ही जमीन फाडून आलेले छोटे छोटे अंकुर बघितले. मी घरी जाऊन आईला बातमी दिली.



जसजसे दिवस गरम होत होते, अंकुर फुटून त्याच्यावर पाने येऊ लागली. पा ना शेतात दुसरीही कामे करावी लागत होती. डुक्कर, गायी, घोडे आणि कोंबड्या, घोडे यांच्यामुळे. पण तरीही आम्ही रोज बटाटे बघायला जात होतो.

एक दिवस त्या रोपावर पांढरी फुले दिसू लागली.

पा जोशात येऊन आपले हात चोळू लागले. “हे आजपर्यंतचे सगळ्यात चांगले पीक असेल.” त्यांनी आपला हात माझ्या खांद्यावर ठेवला आणि ते जवळ घेतले. वर्गात पहिल्या रांगेत बसून मी पूर्ण सकाळभर त्यांचे ते जवळ ओढून घेणे मी अनुभवत होतो.





शाळेचे सत्र संपले. पा ने बटाट्याच्या रोपांवर माती चढवली, आणि तण काढून टाकले. ते मला त्यांचा मदतनीस म्हणू लागले. मी त्यांच्यासारखे उत्साहाने काम करण्याचा प्रयत्न करत होतो पण जमत नव्हते.

ते रोज सकाळी नाष्ट्याच्या आधी काम सुरु करत. आणि संध्याकाळी उशिरा घरी येत. आईला रात्रीचे खाणे उशिरा वाढावे लागे.

पण मला हे चांगले वाटे. कारण पा जेवण्याच्या वेळी सांगत की बटाटे खरेतर पैसेच आहेत.

‘‘या वर्षी ख्रिसमसला सगळ्यांना भेटी मिळतील.” ते आम्हांला म्हणत. “भेटवस्तू, हो ना आई? दुकानातून खरेदी केलेल्या भेटवस्तू!”



उन्हाळा संपला आणि शाळा परत सुरु झाली. आता मी शाळेत दुसऱ्या रांगेत बसू लागलो. सकाळी सकाळी खूप थंडी वाजे. मी माझे हात खिशात कोंबे. जेव्हा चालत असे तेव्हा आपला श्वास हवेत माझ्या समोर धुरासारखा जातांना बघत असे.

दुसऱ्या वेळी जेव्हा आम्ही शेतात गेलो तेव्हा आम्ही बघितले की बटाट्याची रोपे काळी पडली आहेत.



मी एवढा घाबरलो की तिकडून पळून जावे वाटत होते. पण पा नी मला माझा हात मातीत घालायला सांगितला. एवढा आत जोपर्यंत माझ्या हाताला बटाटा लागत नाही. बटाट्याचे गठ्ठे

"म्हटलं होतं ना मी? यावर्षी खूप सारे बटाटे येतील." त्यांनी एक बटाटा उपटला आणि मला दाखवला. "फक्त भेटवस्तूच मिळणार नाही आपल्याला तर कपडेही मिळतील. एकदम नवीन."

त्यांनी माझे खांदे अधिक जोरात दाबले. मी तर विचारही करू शकत नव्हतो की मी नवीन कपडे कधी घेतले होते ते. आई पा च्या जुन्या कपड्यांनी माझ्यासाठी कपडे शिवत असे. मला ते नीट काळजीपूर्वक वापरण्याचा सल्ला सुद्धा देत असे. म्हणजे मला छोटे झाल्यावर माझ्या भावांना ते घालता येऊ शकतील.



मी विचार करत राहिलो पुढे न जाणे काय होईल. हे तेव्हा कळले जेव्हा पा नी आल्फे मुलांना बोलावले. पा नी शेतात खोदाईचे मशीन चालवले. त्यामुळे बटाटे मातीच्या बाहेर आले आणि मला दिसू लागले.पूर्ण शेतभर आता बटाटेच बटाटे दिसत होते.

मी मजूर मुलांबरोबर काम करू लागलो. आम्ही मिळून बटाटे टोपलीत भरले.

बटाट्यानी भरलेल्या टोपल्या पिंपामध्ये रिकाम्या केल्या. कधी मला वाटे की माझे हात तुटून पडतील, एवढे ते दुखत होते.

शेवटी शेत रिकामे झाले. पिंपाने आमची कोठी भरून गेली. पा नी मला आणि माझ्या भावांना एका एका पिंपावर बसवले. आणि मग आईच्या कमरेत हात घालून तिला जवळ घेतले, जसे की ते नाच करणार होते.



त्या रात्री मी पा ना आईशी बोलतांना ऐकले की ते दुसऱ्या दिवशी सकाळीच बाजारात जातील. मी भेटवस्तूबद्दल विचार करू लागलो. नवीन कपड्यांचा विचार करू लागलो. मी त्या सुखद जाणीवेचा पण विचार करू लागलो जी रात्री जेवतांना घरात पसरली होती.

मला पा बरोबर जायचे होते. पण आईने मनाई केली, मला शाळेत जायचे होते ना.

शाळेनंतर मी माझ्या जबाबदारीची सगळी कामे पूर्ण केली. मग मी स्वयंपाकघरात बसून पा ची वाट बघू लागलो. मी त्यांची शिट्टी वाजवत किंवा गाणं गुणगुणत येण्याची वाट बघत होतो.पण मला फक्त घोडागाडीचा आवाज ऐकू आला आणि तेव्हा पा उंबऱ्यात उभे होते.

"वाटते की यावेळी सर्व शेतकऱ्यांनी बटाटेच उगवले आहेत. बटाटे विकले जातच नाही." पा घोडागाडी घेऊन पुढच्या आठवड्यात सुद्धा बाजारात गेले, नंतरच्या आठवड्यात सुद्धा गेले आणि ते प्रत्येकवेळी जात राहिले आणि खांदे पाडत घरी आले. मी जेव्हा कोठीघरात जाई तेव्हा त्यांना बटाट्याकडे एकटक बघताना बघे. जसे की ते बटाटे मोजत आहेत. हवा गार होत होती. सकाळी पाणी भरलेल्या भांड्यावर बर्फ जमा होत होता.



“आपल्याला बटाटे तळघरात ठेवावे लागतील,” पा ने ठरवले.

मजूर मुलांच्या मदतीने त्यांनी पोत्याचे तोंड उघडले. स्वयंपाकघरात असलेला तळघराचा दरवाजा उघडला गेला. पिंप उलटे करून पोत्याच्या उतारांवरून खाली बटाटे घसरत नेले. सगळीकडे मातीच माती झाली होती. आईला हे अजिबात आवडले नाही.

मी पिंप मोजण्याचा प्रयत्न केला पण ती खूप जास्त होती.

“साडे सातशे,” पा म्हणाले. “सातशे पन्नास आणि सगळ्यात चांगला!”

पा नी तळघराचा दरवाजा बाहेरून गवताने झाकून टाकला म्हणजे बटाटे गोठणार नाहीत.

“मला जंगलात जावे लागेल,” ते आम्हांला म्हणाले.

किंग आणि बिलला पा यांनी गाड़ीला जुंपले.





पा राइली ब्रुक नावाच्या एका जागी काम करायला गेले. आई म्हणाली की ते तिथे दोन दिवस प्रवास करून पोहचतील. मला काळजी वाटू लागली की त्यांना खूप थंडी तर वाजणार नाही ना? शिवाय त्यांच्याजवळ एखादे घर राहण्यासाठी असेल ना? मी बाहेर जाऊन त्यांच्या नांगरावर जाऊन बसलो ठीक तसाच जसे ते बसत. मला खरंच त्यांची खूप काळजी वाटत होती.

आईने स्वयंपाकाशिवाय त्यांना पोटभर अन्न मिळेल का?

जेव्हा मी आईला विचारले की ते तिथे काय करतील, आई म्हणाली ते तिथे झाडं कापतील. मला समजत नव्हते की झाडं का विकली जात होती, मग बटाटे का नाही?



जेव्हा पा ख्रिसमसला घरी आले तेव्हा त्यांची मोठी अशी लाल दाढी वाढली होती. ते मला शेताच्या बांधावर घेऊन गेले आणि त्यांनी ख्रिसमसचे झाड कापले. त्यांनी ते घरात आणले म्हणजे मी आणि माझा भाऊ त्याची सजावट करू शकू.

आईने मिठाई केली होती. स्वयंपाकघरात घुसण्याच्या आधीच त्याचा सुंगध येत होता. कोणीही भेटवस्तूंची आठवण काढली नाही. मला तर काढायचीच नव्हती. उलट मला हे सांगायचे होते की मी बटाट्याची काळजी घेत होतो. आठवड्यातून एकदा तळघराचा दरवाजा उघडत होतो.म्हणजे खाली वाकून बघू शकेन.



पा म्हणाले असे करणे अगदी बरोबर होते. ख्रिसमस नंतर ते स्लैज गाडीने ते बाजारात गेले. तिथे ते खूप वेळ थांबले. जेव्हा ते परत आले तेव्हा मी जवळजवळ झोपलो होतो.

‘‘मूर्ख!’’ मी पा ना परत आल्यावर बोलतांना ऐकले.

मी श्वास रोखून घेतला आणि आईला त्यांना शिव्या न देता बोलण्यास सांगण्याची वाट बघू लागलो. पण आई काहीच म्हणाली नाही. पा म्हणाले की त्यांना परत जंगलात जावे लागेल.

मला भीती वाटत होती की पा ना काही होऊ नये. ही सुद्धा भीती होती की ते मला विसरून जाऊ नये. पण जाण्याच्या आधी पा माझ्याजवळ आले. त्यांनी माझे सस्पैन्डर्स ओढले आणि मी त्यांचे

यावेळी जेव्हा पा घरी आले तेव्हा बर्फ पघळू लागला होता. मी तळघराचा दरवाजा उघडणे बंद केले होते. तिथून एक दुर्गंधी येत होती.

मी आईला म्हटले की मी बटाट्याची चांगली काळजी घ्यायला पाहिजे होती. आई म्हणाली की तू अजून काय करू शकला असता? पा ने एकदा वास घेतला आणि ते अस्वस्थ झाले.

‘‘त्यांना घेऊन जाण्याइतके भाडे सुद्धा मिळू शकणार नाही,” ते निराशेने म्हणाले.


मला त्याचा अर्थ समजला नाही. मला तर एवढेच समजले की त्या रात्री झोपेच्या वेळी ते दोघे एवढे हळूहळू बोलले की मला काहीच ऐकू आले नाही.



दुसऱ्या दिवशी सकाळी मी उठलो अन बघितले तर पा आधीच कामाला लागले होते. त्यांनी तळघराचा बाहेरचा दरवाजा उघडला होता आणि गाडीत लादण्यासाठी पिंप ढकलत आणले. पिंप जास्त होते. जेव्हा मी झोपलेलो होतो. त्यांनी पिंप बटाट्याने भरण्यास सुरुवात केली.

ते काही बोलले नाही. बस पिंपात भरभरून ते गाडीत लादत गेले. जेव्हा बारा पिंप भरले त्यांना त्यांनी मजबूत दोरीने बांधले.

मला वाटले की आम्ही रस्त्याने बाजारात जाऊ.





पण मोठा रस्ता पार करून आम्ही शेताकडे वळलो. मी त्यांना बटाटे पेरणे आणि उगवणे याबद्दल काही विचारणार होतो. पण गप्प राहिलो. काहीवेळाने आम्ही रेल्वे रूळ ओलांडला.


आम्ही तिथे पोहचलो जिथे सेंट जॉन नदीचा किनारा होता. जिथे मला खेळायला मनाई होती. पा ने लगाम खेचला त्यामुळे किंग आणि बिल थांबले.

“चल, ये,” मला गाडीतून उतरायला त्यांनी सांगितले.

मला उतरवून ते परत गाडीत चढले. एक पिंप ढकलत किनाऱ्यावर आणले आणि ते त्यांनी उलटे केले. शेकडो बटाटे गडगडत पाण्याकडे गेले. जेव्हा ते पिंप रिकामे झाले, तेव्हा पा नी दुसरे आणि मग तिसरे पिंप जड होते. नदीत बटाटेच बटाटे तरंगत होते. ते बर्फाच्या तुकड्याबरोबर तरंगत होते.

''अजून काही करू शकत नाही त्यांच्याबरोबर, हो ना? पा च्या डोळ्यात पाणी होते. मला त्यांच्याकडे बघायचे सुद्धा नव्हते. “मी त्यांना सडलेले तर सोडू शकत नाही हो ना?”

ते अगदी माझ्याजवळ येऊन उभे राहिले.



त्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवून मला त्यांच्याकडे खेचले. दुपारच्या जेवणाच्या आधी आम्ही दोन वेळा गाडी भरभरून तेच करून परतलो.मी जेव्हा त्यांच्याबरोबर शेवटचे पिंप रिकामे करत होतो

“तर ह्या होत्या भेटवस्तू?” ते म्हणाले.





भेटवस्तू नक्कीच मिळाल्या. पण नंतर. पण त्यांचे महत्व नव्हते. जे सगळ्यात महत्वाचे होते ते म्हणजे त्यांचे माझ्या खांद्यावर हात ठेवणे. परिवाराचा कठीण काळ अजून वाढत गेला. पण पा आमच्या बरोबर असोत नाहीतर नसो. मी त्यांना माझ्या खांद्यावर हात ठेवून ते माझी हिंमत वाढवतांनाचे मला जाणवते.

वाटते की खांदे दाबून विश्वास ठेवणे ही पा नी पेरलेली एक गोष्ट होती. आणि ते पीक बटाट्यापेक्षा अधिक चांगली उगवली. मी आता मोठा झालो आहे पण आजपर्यंत ते मला जाणवते.